# मंत्रिमंडळ निर्णय

## ३ मार्च २०१४

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र.१५६)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना पुढे सुरु राहणार | ग्रामविकास |
| २ | उदगीर येथील दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयातील पदे भरणार | पदूम |
| ३ | सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी साखर महासंघ कारखान्यांकडून साखर खरेदी करणार | अन्न व नागरी पुरवठा |
| ४ | नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्रात पदव्युत्तर पदवी व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम सुरु होणार | वैद्यकीय शिक्षण |
| ५ | होमिओपॅथी व्यावसायिकांना ॲलोपॅथीची परवानगी देण्यासंदर्भात अध्यादेश काढणार | वैद्यकीय शिक्षण |

## पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना पुढे सुरु ठेवणार : ३०० कोटींची तरतूद

तीन वर्षे पूर्ण झालेली पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना पुढे देखील सुरु ठेवण्याचा आणि पात्र ग्रामपंचायतीना प्रत्येक वर्षासाठी अंदाजे एकुण ३०० कोटी रुपये देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाने घेतला.

ही योजना २०१०-११ मध्ये सुरु करण्यात आली होती. एकंदर २७ हजार ८९१ ग्रामपंचायतींपैकी ११ हजार ४४८ ग्रामपंचायतींना निकष पूर्ण न केल्यामुळे या योजनेत सहभागी होता आले नाही. गावागावांच्या पर्यावरण संतुलित विकासासाठी तसेच त्यातून आधुनिक सुविधा बनविण्यासाठी काळाची गरज म्हणून ही योजना पुढील काळात देखील राबविण्याचे ठरले. ही योजना राबवितांना पुढील काळात कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत विविध उद्योजक, कारखानदार यांना सहभागी करून घेण्यात येणार आहे.

या योजनेत पहिल्या वर्षी १६ हजार ४४३ तर दुसऱ्या वर्षी ९ हजार २९० आणि तिसऱ्या वर्षी ४१७४ ग्रामपंचायतींनी निकष पूर्ण केले आहेत. या योजनेत आतापर्यंत एकूण १५ कोटी १० लाख वृक्ष लावण्यात आले असून योजनेचे सर्व निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायती पर्यावरण विकासरत्न पुरस्कारासाठी पात्र ठरल्या आहेत.

-----o-----



## उदगीर येथील दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयातील पदे भरणार

लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयातील ३७ पदे भरण्यास व ३८ पदांचे काम बाह्यस्त्रोतातून (Out Sourcing) करण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यासाठी सुमारे ५७ कोटी ५८ लाख रुपये इतका खर्च येईल. नागपूरच्या महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातंर्गत हे महाविद्यालय सुरु असून मराठवाड्यासारख्या भागात दुग्धव्यवसाच्या विकासासाठी प्रशिक्षित तरुणवर्ग उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या महाविद्यालयाचे महत्व आहे. या महाविद्यालयात दुग्ध तंत्रज्ञानविषयक विविध विभाग कार्यरत आहेत.

-----o-----

अन्न व नागरी पुरवठा

सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी

## साखर महासंघ कारखान्यांकडून साखर खरेदी करणार

सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी खुल्या बाजारातून साखर खरेदीची निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत साखर महासंघाकडून साखर खरेदी करण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. फेब्रुवारी, २०१४ ते जून, २०१४ पर्यंतच्या या ५ महिन्यांसाठी ही साखर खरेदी करण्यात येईल.

या पाच महिन्यांसाठी साखर महासंघाकडून साखर खरेदी दर ठरविण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा तसेच सहकार आणि वित्त विभागाचे सचिव यांची समिती नियुक्त करण्यात आली आहे. न्यायालयीन याचिकांमुळे साखर कारखान्यांकडून लेव्ही साखर घेणे दुरापास्त झाले आहे. जिल्हा स्तरावरुन साखर निविदाकरांकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे नवीन निविदा प्रक्रिया राबवण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे दरम्यानच्या काळात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत साखर उपलब्ध व्हावी म्हणून साखर महासंघाकडून साखर महासंघामार्फत कारखान्यांकडून साखर खरेदीचा निर्णय झाला.

-----o-----

वैद्यकीय शिक्षण

## होमिओपॅथी व्यावसायिकांना ॲलोपॅथीची परवानगी देण्यासंदर्भात अध्यादेश काढणार

होमिओपॅथी व्यावसायिकांना ॲलोपॅथी करण्यासंदर्भात मंत्रिमंडळाने यापूर्वीच निर्णय घेतला असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अध्यादेश काढण्याचे आज मंत्रिमंडळ बैठकीत ठरले.

ॲलोपॅथी व्यवसाय करण्यापूर्वी होमिओपॅथी व्यावसायिकांना आधुनिक वैद्यकशास्त्रातील औषधशास्त्राचा एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उत्तीर्ण करण्याची अट आहे. यादृष्टीने मुंबई समचिकित्सा व्यवसायी अधिनियम १९५९ आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मात्र, सध्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरु नसल्याने याबाबत अध्यादेश काढण्याचा निर्णय झाला.

-----o-----

## नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्रात ५६८ खाटांच्या रुग्णालयासह पदव्युत्तर अभ्यासक्रम संस्था सुरु होणार

उत्तर नागपुरातील इंदोरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्राचे श्रेणीवर्धन करून ५६८ खाटांचे रुग्णालय सुरु करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाने घेतला. या रुग्णालयात पदव्युत्तर पदवी व अतिविशेषोपचार अभ्यासक्रमाची संस्थाही सुरु करण्यात येणार आहे.

या परिसरातील तसेच शेजारील राज्यातील रुग्णांना अधिक चांगल्या रुग्णसेवेचा लाभ देण्याच्या हेतुने हा निर्णय घेण्यात आला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्रामध्ये सध्या फक्त बाह्यरुग्ण सेवा पुरविली जाते. नागपूर शहराची लोकसंख्या २६ लाखांपेक्षा अधिक असून ती सतत वाढत आहे. उत्तर नागपूर या भागामध्ये अनुसुचित जातीचे बाहुल्य आहे. केंद्रीय नियोजन आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे ज्या भागामध्ये अनुसुचित जातीचे बाहुल्य ४० टक्के पेक्षा अधिक आहे अशा भागात अनुसुचित जाती उपयोजनेतून खर्च करता येतो. यामुळे या संस्थेचे श्रेणीवर्धन करून रुग्णालय व पदव्युत्तर अभ्यासक्रम संस्था सुरु करण्यासाठी येणारा २०९ कोटी रुपये आणि पुढील ५ वर्षासाठी येणारा खर्च अनुसूचित जाती उपयोजनेतून भागविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

या संस्थेकडे २९ हजार ७९ चौरस मिटर जागा उपलब्ध होऊ शकते. या जागेत ४९ हजार ६९३ चौरस मिटर बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच श्रेणीवर्धनातंर्गत वैद्यक शास्त्रातील विविध २८ विभाग सुरु करण्यात येणार असून त्या त्या विभागासाठी आवश्यक यंत्रसामग्री, फर्निचर व अनुषंगीक गोष्टी खरेदी करण्यात येणार आहेत. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामुळे कुशल वैद्यक व्यावसायिक उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर या परिसरातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांना खाजगी रुग्णालयांचा आधार न घेता उच्च दर्जाचे उपचार उपलब्ध होणार आहेत.

-----o-----